
ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 9 | ISSUE - 9 | MAY - 2023

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# महाराष्ट्रात जलक्रांती घडवून आणणारे जलनायक सुधाकररावजी नाईक साहेब



रोहित बाबूसिंग चव्हाण
संशोधक विद्यार्थी, मु.पो. कळंबा (बोडखे) ता.मंगरुळपिर जि. वाशिम.

## प्रास्ताविक:-

मोठ्या झाडाखाली उगवलेल्या लहान झाडाची नीट वाढ होत नाही हा निसर्गाचा नियम आहे हा नाईक घराण्याच्या बाबतीत लागू होत नाही. सुधाकररावांचा घराण्याला राजकीय पार्श्वभूमी लाभलेली होती. तसेच त्यांनी विद्यार्थी दशेतून सामाजिक व राजकीय क्षेत्रात सहभाग घेतल्याने त्यांना राजकारणाची आवड निर्माण झाली. महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचे सुधाकरराव नाईक हे पुतणे आहेत. सुधाकररावांनी आपल्या राजकीय जीवनाची सुरुवात गहुली गावातील सरपंच या पदापासून केली. या काळात त्यांनी गावाच्या अनेक विकासाच्या योजना साकार केल्या. १९६२ साली ते पुसद पंचायत समितीचे सभापती झाले. १९७२ पर्यंत सुमारे दहा वर्षे त्यांनी या पदावर मोठ्या धडाडीने काम केले. या काळात त्यांनी पुसद तालुक्यातील अनेक समस्या सोडवल्या. पुसद तालुक्यातील राजकारणाचा अभ्यास करून पक्ष बांधणी केली. १९७२ साली सुधाकरराव नाईक यवतमाळ जिल्हा परिषदेचे अध्यक्ष झाले. १९७७ पर्यंत त्यांनी हे पद भूषवले याच काळात त्यांनी यवतमाळ जिल्हा काँग्रेस कमिटीचे सचिव म्हणून यशस्वीपणे काम केले. संपूर्ण जिल्ह्यात काँग्रेस पक्ष मजबूत केला व आपल्या नेतृत्वाची सर्वांना ओळख करुन दिली. सुधाकररावांचा शेतीविषयक आंतरिक तळमळ त्यांच्या सरपंच, पंचायत समिती सभापती आणि जिल्हा परिषदेचे अध्यक्ष या पदावरील कार्यातून दिसून येते. महाराष्ट्रात हरित क्रांतीचा कार्यक्रम राबवला गेला त्यावेळी ते यवतमाळ जिल्हा परिषदेचे अध्यक्ष होते.

## राजकीय कारकीर्द:-

स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सुधाकरराव यांच्या राजकीय व सामाजिक कार्याची दखल राज्य पातळीवर घेतली गेली. एप्रिल १९७७ मध्ये वसंतदादा पाटील यांच्या मंत्रिमंडळात राज्यमंत्री म्हणून त्यांचा समावेश झाला आणि राज्य पातळीवरील त्यांच्या राजकीय कारकीर्दीची सुरुवात झाली. त्यांच्याकडे कृषी, सिंचन क्षेत्र, विकास प्राधिकरण व दुग्धविकास या खात्याचा कार्यभार सोपवण्यात आला. जून १९७७ मध्ये ते नागपूर स्थानिक स्वराज्य संस्थातून विधानपरिषदेवर निवडून आले. १९७८ मध्ये महाराष्ट्रात विधानसभेच्या निवडणुका झाल्या या निवडणुकीत पुसद मतदार संघातून सुधाकरराव नाईक यांनी उमेदवारी मिळवली व निवडणुकीत विजयी झाले. वसंतदादा पाटील महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले त्यांच्या मंत्रिमंडळात सुधाकरराव नाईक गृहनिर्माण, पशुसंवर्धन व मत्स्यव्यवसाय खात्याचे मंत्री झाले. १९८० मध्ये महाराष्ट्रात विधानसभेच्या मध्यवर्ती निवडणुका झाल्या. या निवडणुकीत पुसद मतदारसंघातून सुधाकरराव नाईक विजय झाले. निवडणुकीत काँग्रेस पक्षाचे बहुसंख्य आमदार निवडून आले त्यामुळे बॅरिस्टर ए. आर. अंतुले महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. अंतुले यांच्या मंत्रिमंडळात सुधाकरराव नाईक सहभागी झाले नाहीत.

१९८५ मध्ये झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत पुसद मतदार संघातून सुधाकरराव नाईक निवडून आले. वसंतदादा पाटील पुन्हा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. त्यांच्या मंत्रिमंडळात त्यांनी उद्योग, महसूल, पुनर्वसन व समाजकल्याण या खात्याचा कारभार पाहिला. ३

जून १९८५ मध्ये शिवाजीराव पाटील निलंगेकर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. त्यांच्या मंत्रिमंडळात नाईक यांची नियुक्ती करण्यात व तीच खाती देण्यात आली. फेब्रुवारी १९९० साली राज्यात विधानसभेच्या निवडणुका झाल्या. पुसद मतदार संघातून सुधाकरराव नाईक भरघोस मतांनी निवडून आले. शरद पवार हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले त्यांच्या मंत्रिमंडळात नाईकसाहेब महसूल व सांस्कृतिक खात्याचे मंत्री म्हणून त्यांनी कारभार पाहिला. पुढे ते महाराष्ट्राचे शिक्षण मंत्री सुद्धा झाले. शिक्षण मंत्री म्हणून त्यांनी महत्त्वाचे कार्य केले. अमरावती विद्यापीठाची स्थापना त्यांच्या शिक्षण मंत्रिपदाच्या कारकिर्दीत झाली. शैक्षणिक क्षेत्रात वेगवेगळ्या बाबीचा अभ्यास करण्यासाठी नामवंत शिक्षण तज्ञांचा समावेश असलेली शिक्षण समितीची स्थापना केली. या समितीने सादर केलेल्या अहवालातून अनेक शिफारसींची पुढे राष्ट्रीय शिक्षण कार्यक्रमात समावेश करण्यात आला आणि खासगी, अभियांत्रिकी महाविद्यालय व तंत्रनिकेतन त्यांच्या कार्यकाळात सुरू करण्यात आला.

सुधाकरराव नाईक यांनी आपल्या तेरा वर्षाच्या राजकीय कार्यकाळात शिक्षण, महसूल,गृहनिर्माण,दुग्धविकास,उद्योग,उर्जा,समाज कल्याण व सांस्कृतिक अशा विविध महत्त्वाची खाती कार्यक्षमतेने व मोठ्या कौशल्याने सांभाळली. त्यांच्याकडे सोपवण्यात येणाऱ्या प्रत्येक खात्याचा सखोल अभ्यास करत त्यामुळे प्रशासनावर त्यांची पकड असायची. ज्या विभागात त्यांनी काम केले त्या विभागाला त्यांनी विशिष्ट दर्जा मिळवून दिला. आपल्या स्वतःच्या कार्यकर्तृत्वाचा ठसा त्या विभागाच्या कामकाजावर उमटविला.

## जलसंधारण खात्याची निर्मिती करून जलक्रांती:-

१९९१ साली देशात लोकसभेच्या निवडणुका झाल्या या निवडणुकांमध्ये काँग्रेस पक्षाचे बहुसंख्य उमेदवार खासदार म्हणून निवडून आले. पी. व्ही. नरसिंहराव देशाचे पंतप्रधान झाले. त्यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री शरद पवार यांना देशाच्या संरक्षण मंत्री पदी नियुक्त केले. त्यामुळे शरद पवार यांनी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी आपले वारसदार म्हणून सुधाकरराव नाईक यांची निवड केली. २५ जून १९९१ रोजी नाईक साहेब महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री झाले. महाराष्ट्राला टंचाईमुक्त, ट्रॅक्टरमुक्त करायचे असेल तर जमिनीत पाणी मुरवले पाहिजे या जलक्रांतीसाठी स्वतंत्र जलसंधारण खात्याची निर्मिती करून महाराष्ट्रात "पाणी आडवा पाणी जिरवा" हा संदेश दिला. महाराष्ट्राला वाळवंट होण्यापासून वाचवायचे असेल तर पृथ्वीवर पडणारा पाण्याचा एक थेंब वाहून जाऊ न देता जमिनीत साठवून ठेवावा. जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदावरून कामाचा ताण आणि जबाबदारी ओळखून सर्व जिल्हा परिषद अध्यक्षांना त्यांनी राज्यमंत्रिपदाचा दर्जा त्यांच्या कल्पनेतून दिला. महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील मुलांना मोफत शिक्षण करून त्यांनी एक रुपया शिक्षण त्यांना जाहीर केले. तालुक्यात विद्यार्थ्यांना वसतिगृहे, जिल्हा स्तरावर निराधार महिलांसाठी आधार केंद्र सुरू केली अशी अनेक महिला विषय निर्णय त्यांनी घेतले. वसंतराव नाईक नेहमी म्हणायचे की सुधा महाराष्ट्राचा चांगला मुख्यमंत्री होईल सुधाकररावांनी आपल्या कृतीने ते खरे करून दाखवले राज्याच्या विकासासाठी अनेक महत्त्वपूर्ण योजना त्यांनी आपल्या अल्पावधीतच एक कार्यक्षम मुख्यमंत्री अशी आपली प्रतिमा निर्माण केली.

## मुंबईच्या गुन्हेगारी जगताला हादरा दिला:-

नाईकसाहेबांनी आपल्या मुख्यमंत्री च्या काळात मुंबईच्या गुन्हेगारी जगताला हादरवून सोडण्याचे काम १९९१ ते १९९३ या काळामध्ये मुख्यमंत्री असताना केले. मुंबईच्या गुन्हेगारी जगताला सुधाकररावांनी आपल्या शौर्याने टक्कर दिली परंतु मुंबईतील दंगल व्यवस्थितपणे न हाताळण्याचा आरोप त्यांच्यावर झाला त्यामुळे ते वादाच्या भोवऱ्यात सापडले या परिस्थितीत २२ फेब्रुवारी १९९२ साली त्यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला त्यानंतर ३० जून १९९४ मध्ये पक्षश्रेष्ठींनी सुधाकरराव नाईक यांच्याकडे हिमाचल प्रदेशचे राज्यपाल पदाची जबाबदारी सोपविली. राज्यपालपदी असताना कोणीही घेतला नसेल इतका रस सुधाकररावांनी हिमाचल प्रदेशाचा विकास कामात घेतला. शिक्षणापासून ते आरोग्य सुविधा पर्यंत अनेक समस्या त्यांनी पुढाकार घेऊन सोडवल्या राज्यातील जवळपास प्रत्येक जिल्ह्यात त्याने भेटी दिल्या नंतर राज्यपाल पदामुळे त्यांचा जीव गुदमरला व शेवटी १० सप्टेंबर १९९५ रोजी राज्यपाल पदाचा राजीनामा देऊन महाराष्ट्रात परतले व महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा सक्रिय झाले. १९९८ साली देशातील लोकसभेच्या निवडणुका झालेल्या या निवडणुकीत वाशिम लोकसभा मतदारसंघातून काँग्रेस पक्षातर्फे निवडणूक लढवून निवडून आले. दिल्लीत गेल्यावर त्यांनी अखिल भारतीय कॉंग्रेस समितीचे सरचिटणीस म्हणून काम पाहिले. जून १९९९ मध्ये शरद पवार यांनी काँग्रेस पक्ष सोडून त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षाची स्थापना केली आणि सुधाकररावांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला व शरद पवार यांना साथ दिली. १९९९ मध्ये राज्यात विधानसभेच्या निवडणुका झालेल्या या निवडणुकीत पुसद मतदार संघातील राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार म्हणून निवडून आले. राज्यात

काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सरकार सत्तेवर आले. विलासराव देशमुख हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले.त्यांनी सुधाकरराव नाईक यांच्याकडे महाराष्ट्र जलसंधारण परिषदेचे अध्यक्ष पदाची जबाबदारी सोपवली. या पदावर कार्य करत असताना ९ मे २००१ रोजी त्यांना पक्षाघाताचा झटका आला. डॉक्टरांनी तातडीने त्यांच्यावर उपचार केले परंतु त्यांना यश आले नाही. १० मे २००१ रोजी त्यांची प्राणज्योत मावळली गहुली या गावी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

सुधाकरराव नाईक यांनी संपूर्ण महाराष्ट्रात जलसंधारणाचे नेते म्हणून ओळख त्यांनी आपल्या व्यक्तिमत्वाने महाराष्ट्राच्या राजकारणात निर्माण केली. एक अभ्यासू,कर्तबगार,धाडसी व स्पष्ट बोलणारा नेता म्हणून त्यांची ओळख आहे. त्याचे नेतृत्व हे बंजारा समाजासाठी व महाराष्ट्राच्या विकासासाठी प्रेरणादायी ठरले. जलसंधारणाचे प्रणेते, जलनायक,महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री स्व. सुधाकरराव नाईक यांचे जलव्यवस्थापनाचे कार्य महाराष्ट्रातील जनतेच्या मनात नेहमी संस्मरणीय राहील. त्यामुळे २१ ऑगस्ट नाईक साहेबांचा जन्म दिवस हा संपूर्ण महाराष्ट्रामध्ये जलसंधारण दिवस म्हणून साजरा केला जातो.

## संदर्भसूची :-

१) प्रा. निसर्ग आडे, विदर्भ मतदार (स.पा.) १०मे २०२०

२) अवि गोविंदराव चव्हाण. बंजारा पुकार. वसंतरावजी नाईक जयंती विशेषांक जुलै २०१६, पृ.क्र. ८

३) सोपान गाडे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक. अविष्कार प्रकाशन, पुणे २००८ पृ. क्र. ३

४) कित्ता पृ. क्र. ६

५) कित्ता पृ.क्र. ९

६) पवार दशरथ शाम. विदर्भातील बंजारा समाज संस्कृती, लोकगीत व परंपरांच्या इतिहासाचे अध्ययन. अप्रकाशित शोधप्रबंध. पृ. क्र. २८६

७) सोपान गाडे, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, सुधाकरराव नाईक, पूर्वोक्त. पृ. क्र. १४

८) कित्ता पृ. क्र. १६

९) चव्हाण पंजाब. बंजारा हस्तकलेची शोकांतिका पूर्वोक्त. पृ. क्र. २८

१०) सोपान गाडे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक, पूर्वोक्त पृ.क्र. १८

११) जाधव रमेश (डॉ.) गोरवाणी, जानेवारी तो जन २०१४ पृ.क्र. १९

१२) सोपान गाडे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, सुधाकरराव नाईक. पूर्वोक्त. पृ.क्र. २५